राष्ट्रमेव जयते

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

## १८ वा

## वार्षीक अहवाल

## २०१७-१८

अल्पदरात सुवर्ण कर्ज उपलब्ध



पहिला माळा, खत्री कॉम्पलेक्स, वॉलकट कंपाऊंड, अमरावती ४४४६०१


# सन्मानननीय संचालक मंडळ - 2017-22



अध्यक्ष
**इंजि. अविनाश कोठाळे**
M.I.E., L.L.B., ADIM, DMM



उपाध्यक्ष
**इंजि. राजेंद्र जाधव**
B.E. (Mech.)



**श्री. बाळासाहेब वैद्य**
M.Sc (F.I.V)



**प्रा. अनिल बंड**
M.Sc. (Agri)



**इंजि. मोरेश्वरराव वानखडे**
B.E.



**श्री. अरविंद डि. गावंडे**
B.E. ( Civil) DIT



**श्री. सुनित रा. चाफले**
M.Sc. (Agri) A.H.D



**श्री. चिंतामराव राऊत**



**श्री. बबनराव आवारे**
B.A



**श्री. संजय ढोरे**
B.A



प्रा.डॉ. सौ. प्रतिभाताई विघळे
M.Sc., PH.D




सौ. सुजाताताई मावरे
M.A



सौ. किरणताई महल्ले
M.A., L.L.B



प्रा. शरद बंड
M.Sc.



इंजि. राजेन्द्र अढाऊ
B.E. (Civil)

B.C.E. AMICE (I)

# सर्व सभासदांना विनम्र आवाहन

- अद्यापपर्यंत ज्या सभासदांना शेअर सर्टीफिकेट मिळाले नाही त्यांनी बँकेस अद्यावत पत्ता, अचुक मोबाईल, फोन नंबर लेखी पत्रासह द्यावेत.
- ज्या सभासदांनी अजुनपर्यंत बचत खाते सुरु केले नाही, त्यांनी बचत खाते काढावे, ही विनंती. बँकेतर्फे दरवर्षी भागभांडवलधारकांना लाभांष (डिव्हीडंट) त्यांचे बचत खात्यामध्ये जमा केल्या जातो. डिव्हीडंट वारंट प्रत्येक भागधारकास बँकेमध्ये नोंद असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येतात.
- आपला पत्ता व वारस इत्यादी मध्ये बदल झाला असल्यास बँकेस कळवावे, म्हणजे संगणका मध्ये योग्य नोंद करता येईल व अचुक पत्त्यामुळे बँकेला संपर्क साधणे शक्य होईल.
- आपण जिजाऊ बँकेतील सर्व ठेव योजनांचा लाभ घ्यावा व इतरांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे तसेच संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा. कोणत्याही सहकारी बँकेत रक्कम गुंतवणुक करतांना सातत्याने तीन वर्ष बँक नफ्यात असेल, सभासदांना १२ ते १५ % लाभांश दिला असेल , तथा नक्त अनुत्पादक कर्ज 0% असेल व भागभांडवल पर्याप्तता (CRAR) किमान १५% चे वर असेल, तेथेच रक्कम सुरक्षित आहे, असे समजावे.
- मुदती ठेवीवर रु. १०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त व्याज मिळत असल्यास बँकेस व्याजाच्या रक्कमेच्या १०% इतका आयकर भरणे अनिवार्य झालेले आहे. कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे ज्या सभासदांनी पॅन नंबर दिलेला नसेल त्यांचा २०% इनकम टॅक्स कापावयाचा आहे. त्यामुळे सर्व सभासदांनी आयकर लागत असेल किंवा नसेल तरी सुध्दा पॅन नंबर काढणे आवश्यक झालेले आहे. सर्व खातेदारांनी फॉर्म क्र.१५ जी व १५ एच भरुन आयकर कापण्याची जबाबदारी स्वत: घ्यावी अन्यथा एकुण गुंतवणूक रु.१०,००० पेक्षा व्याज जास्त मिळाल्यास सदर व्याजामधुन बँकेला आयकर कापावा लागेल. कृपया सहकार्य करावे.
- ज्या सभासदांना त्यांच्या जमाठेवीवर रु. १०,०००/- किंवा जास्त व्याज त्यांच्या जमा ठेवीवर मिळत आहे. परंतू त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न रु. २,५०,०००/- पेक्षा जास्त नाही व वरिष्ठ नागरिकांसाठी रु. ३ लक्षापेक्षा जास्त नाही ते सभासद फॉर्म नंबर १५ एच व १५ जी दरवर्षी एप्रिलमध्ये किंवा खाते उघडतांना देवुन टॅक्स कपात वाचवू शकतात. सदर संधीचा लाभ घ्यावा.
- सर्व कर्जदार सभासदांनी कर्जफेड वेळेवर व मुदतीत करुन संस्थेस सहकार्य करावे.
- आपण ज्या कर्जदारास जामीन आहात, ते कर्जदार कर्जाचे हप्ते वेळेवर भरतात किंवा नाही याकडे कर्जदाराच्या जामीनदारांनी विशेष लक्ष द्यावे. सदर कर्जाची जोखीम एकत्रित आहे.
- आपली बँक, आपले कर्ज, आपले ठेवीदारांचा विश्वास, हाच सहकाराचा मुलमंत्र यशस्वी करण्यासाठी सर्व सभासद, हितचिंतक, ठेवीदार, कर्जदार यांनी त्यांचा सक्रीय सहभाग बँकेस द्यावा. हि विनंती !

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक, लि. अमरावती.

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्पलेक्स् बॉलक्ट कंपाऊंड, अमरावती
फोन नं. : २५६००५७ , २५७००५६, फॅक्स : (०७२१) २५६६१५६
नोंदणी क्र. : एटीआय/बिएनके/(ओ)/३१२/९९/ दि. ३१.०३.१९९९
आर.बी.आय./परवाना/व्ही.बी.आय.डी./नागपूर/एम.एच./००१२/दि. १६/६/२०००
Email - jijaubankamravati@gmail.com Website : jijaubankamravati

सन्माननीय,
भागधारक सभासद, बंधू/भागिनिंनो,
सस्नेह जय जिजाऊ !

क्र. जिजाऊ/वा.स.सा. सभा/५५५/२०१८
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१८

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि. अमरावती ची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक ३०/०९/२०१८ रोजी सकाळी १० वाजता, अभियंता भवन, शेंगाव नाका चौक, व्हि. एम.व्हि रोड, अमरावती.** येथे खालील विषयानुसार कामकाज करण्याकरीता आयोजीत केली आहे. आपण सभेकरीता निमंत्रित असल्याने उपस्थित राहावे, ही नम्र विनंती !

संचालक मंडळाचे आदेशान्वये
**शरद शे. भोकसे**
मुख्य कार्यपालन अधिकारी

**सभेची विषय पत्रिका :**

१) दिनांक २४ सप्टेंबर २०१७ रोजी झालेल्या १७ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०१७-१८ (३१ मार्च २०१८) या वार्षिक अहवाल, अंकेक्षित हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजुर करणे.
३) सन २०१७ - १८ या वार्षिक वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास मंजुरात प्रदान करणे,
४) बँकेचे सन २०१८ -१९ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे व सन २०१७ -१८ चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मंजुरात देणे
५) सन २०१८-१९ करिता बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणे
६) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांकडील सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षात येणे बाकी कर्ज प्रकरणांची माहिती घेणे.
७) बँकेच्या वार्षिक विकास आराखड्यास व दिर्घ मुदती विकास आराखड्यास मंजुरात प्रदान करणे.
८) एकरकमी कर्ज परतफेड प्रकरणांना मान्यता प्रदान करणे.
९) बँकेचे आर्थिक वर्ष २०१८-१९ करीता संवैधानिक लेखापरिक्षकाची (सनदी लेखापालाची) नियुक्ती करणे
१०) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या संवैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल व त्रृटी पुर्तता अहवालची नोंद घेणे.
११) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखा परिक्षक नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१२) संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मान्यता प्रदान करणे.
१३) मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

टिप : १) गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच अर्ध्या तासा नंतर, त्याच दिवशी, त्याच विषयावर व त्याच ठिकाणी घेण्यात येईल, व सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) बँकेचे कामकाजाविषयी सभासदांना प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर बँकेस द्यावे व पोच घ्यावी.
३) बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडुन लाभांश/धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत; बँकेत ज्या भागधारकांचे बचत खाते आहे त्यांच्या खात्यात कर्ज असल्यास कर्जाचे खात्यात लाभांश जमा केला जाईल.
४) भागधारकांनी वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी व भाग प्रमाणपत्राकरीता अचूक पत्ता बँकेत नोंदवावा.
५) सर्व भागधारकांनी के.वाय.सी.ची पूर्तता करावी म्हणजे आपले फोटो असलेले ओळखपत्र, आधार कार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड तसेच रहिवासी असल्याचा दाखला संबंधिचे कागदपत्र बँकेस आजपर्यंत दिले नसल्यास, त्वरीत देऊन सहाकार्य करावे.
६) बँकेच्या प्रति भागाचे मुल्य रु. २५/- वरुन रु. १०००/- झाल्यामुळे अपुर्ण भागधारकांची यादी बँकेने नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेली आहे व त्यांना लेखी स्वरुपात पत्र सुध्दा पाठविले आहे. करिता अपूर्ण भाग धारकांनी भागपुर्तता करण्यात यावी.

# अध्यक्षीय मनोगत



सन्माननीय
**सभासद बंधु व भगिनिंनो,**
**सस्नेह जय जिजाऊ !**

१८ व्या वार्षिक सर्वधारण सभेच्या निमीत्याने आपल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचा सन २०१७-१८ चा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आपल्या सर्वांच्या साक्षीने **''एकमेंकासाह्य करू, अवघे धरू सहकाराचा सुपंथ''** याप्रमाणे **७ ऑक्टोंबर २००० विजयादशमीच्या शुभ पर्वावर सुरू केलेली आपली बँक,** बँकींग मापदंडानुसार सातत्याने नफ्यात असून सुदृढ १७% भांडवल पर्याप्तता व शुन्य टक्के नक्त अनुत्पादक कर्जासह १९ व्या वर्षात आपण सशक्तपणे पदार्पन करित आहोत. बँकेच्या संस्थापक, अध्यक्ष व सर्व आजी माजी नि:स्पृह संचालक मंडळाच्या वतीने आपणास सन २०१७-१८ च्या अहवाला मधिल ठळक वैशिष्ट्ये कळवितांना हर्ष होत आहे.

तद्वतच डिजीटल बँकींग, नोटा बंदीमुळे आर्थिक मंदिचे सावट, अर्थिक चोखंदळ कमी व्याज दराने कर्ज मागणाऱ्या ग्राहकांची मागणी, ए.टि.एम. व अत्याधुनिक या सर्व आधुनिक बँकींग स्पर्धामध्ये टिकण्याकरीता नवी आव्हाने आपल्या सर्वांसमोर सशक्तपणे उभी असून सर्वांच्या सहकार्याने विविधतेत एकसंघ राहून मार्गक्रमण आपण करणार आहोत. सन २००१-२००६, २००६-२०११, २०११-२०१७, व २०१७-२०२२ या कार्यकाळात आपण अविरोधपणे बँकेच्या हिताकरीता केलेली संचालकांची निवड निश्चीतपणे संचालकांच्या **''धैर्यवेड अंतरात कष्टाची भिती कुणा। हितगुज कष्टाशी सोबतीच सहकाराच्या याच खुणा''**। या पंक्तीनुसार बँकेच्या उत्कर्षाकरीता सदैव सर्व संचालक कार्यमग्न आहेत. हे सागतांना विशेष अत्यानंद वाटतो. सन २०१७-१८ मध्ये संचालक मंडळाच्या चिकीत्सक वृत्तीने प्रत्येक बाबींवर सर्वकष चर्चा करून **''वादे वादे जायते तत्व बोध: । तत्व बोध: जायते सहकार सच्चिदानंद:।।''** या पंक्तीनुसार समाजाचे विविध घटक, सामान्य नागरीक, शेतकरी, स्वव्यावसाईक, उद्योजक, बांधकाम क्षेत्र व होटेल व्यावसायीक, पर्यटन,महिला, सेवाक्षेत्र, मल्टि स्पेशालीटी हॉस्पीटल, डॉक्टर्स, इंजीनीअर्स इत्यादींकरीता सुलभतेने कर्ज उपलब्ध करुन सहकाराचा हा यशोरथ संक्रमित ठेवतांना नविन योजना कार्यान्वयन करून सहकाराच्या उच्चतम शिखरापर्यंत अर्थसंपन्न समाज निर्मीतीकडे आपली बँक अग्रेसर राहील, हा मला या प्रसंगी विश्वास आहे.

बँकेच्या ७०५० सभासदांचे **रु.७.१३ कोटी** भागभांडवल व **रु.२०० कोटी** पेक्षा जास्त व भविष्यात जमा होणाऱ्या **ठेवी १००% सुरक्षित आहे.** अमरावती शहरात मुख्य शाखा वालकट कम्पाऊंड, गाडगेनगर, कठोरा रोड, साईनगर, मोतीनगर, या ५ शाखांसह तालुक्यामधिल दर्यापूर, परतवाडा व चांदूरबाजार या ३ शाखांसह अकोला, यवतमाळ, नागपूर या जिल्हा स्थळी असलेल्या बँकेच्या एकुण ११ शाखामधून अहवाल वर्षाअखेर एकुण कर्ज **रु. १२७.९७ कोटी** कर्ज वाटपा मध्ये १७% नक्त वाढ व ठेवींमधील १७% वाढ बँकेच्या निरंतर विश्वसनीय प्रगतीची साक्ष देते. आपल्या बँकेची आधुनीक व स्पर्धात्मक युगात चिरकाल प्रगती होण्याच्या दृष्टीने इतर शाखा सुदृढ करण्याकरीता **''बहुजन हिताय व बहुजन अर्थ सुखाय''** याकरीता राष्ट्रोन्नतीच्या भावनेने सर्व समावेशक समाज उन्नतीकरीता आपल्या सहकारी बँकेमध्ये सभासदांची मागणी, रिझर्व बँकेचे कर्जासंबंधीचे धोरण, बँकेचे धोरण, कर्जदाराचा पूर्वानुभव, परतफेड क्षमता, तारण मुल्यांकन व कर्जदाराचे मासिक वार्षिक उत्पन्न, व्यवहाराची व्यापारी उलाढाल व [illegible] तपासून आर.बी.आय. चे मार्गदर्शनपर निरीक्षण, संविधानिक अंकेक्षणातील टिपण्यांच्या अनुषंगाने सिस्टीम कंट्रोल आणून अहवाल वर्षात शिस्त यावी याकरिता कर्ज वाटप कार्यपध्दतीमध्ये अनेक बदल करून **बँकेने तत्परतेने कर्ज वितरण** करण्यावर भर दिला आहे. अहवाल वर्षात एकूण ५५ कोटी कर्ज वाटप विविध कारणांकरीता केले असुन नियमित व थकीत कर्जधारकांकडील वसुली एकुण रु. ३६ कोटी पर्यंत केलेली आहे.

विविध कर्ज दारांकडे बँकेचे एकूण नक्त **कर्ज रु.१२७.९७ कोटी** असून प्रामुख्याने २६% कर्ज व्यावसाईकांना कॅश क्रेडीट , लघु व मध्यम(एस.एम.एस.आय.) उद्योजक व्यापार घटकांना, कत्राटव्यावसाईक यांना ३९%, मालमत्ता तारण कर्ज १४%, व शेतकरी बंधूना शेती विकास व इतर कारणाकरीता ६% पर्यंत कर्ज वाटप केले आहे. बँकेने ठेव:कर्ज सीडी गुणोत्तराचे प्रमाण सन २०१७ ला, ६१.०९% वरून ६४.९२% पर्यंत वाढविले असल्याने शिघ्रतेने तत्परतेने कर्ज वाटून बँकेच्या नफ्यामध्ये अहवाल वर्षात वाढ केलेली आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीयकृत व इतर नागरी सहकारी बँकामध्ये व एकूणच बँकींग क्षेत्रामध्ये मंदीचे सावट असतांना आपल्या बँकेमधील ठेवी व कर्ज वाढत असून आपल्या बँकेच्या नवीन व्यावसाईक धोरणामुळे किमान नफा या तत्वावर कर्जाचे दर १० ते १२% पर्यंत आणलेले असून ठेवीदारांना इतर बँकापेक्षा ठेवीचे दर महत्तम ९% द.सा.द.शे. बँकेने दिलेला आहे. **ठेवीदारांना जास्त परतावा व कर्जदारांना माफक कर्ज दर** आणि बँकेचा खर्च नियंत्रीत करण्याची निती बँकेने अवलंबलेली आहे. बँकेचा अहवाल वर्षात नेट एनपीए जरी शुन्य आहे तरी ग्रॉस एन.पी.ए. कमी करण्यासाठी स्वतंत्र कर्जवुसली पथके निर्माण कलेली असुन मागील काळातील कर्ज धारकांकडे सातत्याने पाठपुरावा, तगादा, कायदेशीर कार्यवाही करून अहवाल वर्षात थकीत कर्जापैकी रु. २ कोटी व एकूण कर्जासह रु. ३७ कोटी वसूल केलेले आहे. महाराष्ट्र सहकार खात्याची बँकांचा एकुण एन पी ए कमी करण्यासाठीची एकमुस्त परतफेड कर्ज योजना व बँकेने स्विकारलेल्या कर्ज परतफेड धोरणानुसार सातत्याने थकित कर्जदारांकडे सक्तिची कर्ज वसुली या कार्यवाहीमुळे भागधारक व ठेवीदारांचे सदैव हित जोपासतांना अनेक थकीत कर्जदारांपैकी सहकार खात्याच्या एकमुस्त कर्ज परतफेड योजनेचा लाभ काही ग्राहकांनी घेतलेला आहे.

अहवाल वर्षात बँकेने कर्ज, गुंतवणूक , बँकींग सिस्टीम, गुणवत्ता, वसूली, ग्राहक रिलेशनशिप याबाबत कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षणावर भर दिला आहे. भविष्यातही कर्मचारी व भागधारक यांचे प्रशिक्षणासंबंधी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न आहे.

अहवाल वर्षात बँकेने बँकींग बिझीनेस वाढविण्यावर, **बँक विस्ताराकरीता नवीन एकुण ८ शाखा** निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. परंतू रिझर्व बँकेने राष्ट्रीयकृत बँकांमधील अनेक स्थित्यंतरे, राष्ट्रीयकृत बँकांचा तोटा लक्षात घेऊन नविन शाखांचे धोरण सर्वच नागरी सहकारी बँकांसाठी स्थगीत ठेवल्याने आपल्या बँकेचा नविन शाखांचा प्रस्ताव प्रलंबित आहे.

बँकेच्या मुख्य कार्यालयाची नविन इमारत भागधारकांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असल्याने व भागधारकांच्या भक्कम सहकार्यामुळेच बँकेच्या इमारतीचे स्वप्न साकार होणार आहे. परंतु इमारत परवाना विलंब, बांधकामाच्या मुळ निविदांमध्ये आवश्यक कामे स्वंलग्न नसल्याने काही कामांच्या स्वंतत्रपणे नव्याने निविदा काढल्यामुळे सुधारीत आराखडया प्रमाणे सन २०१८-१९ मध्ये सदर इमारत बांधकाम पुर्ण होईल हा संचालक मंडळास विश्वास आहे.

बँकींग क्षेत्रात डिजीटल बँकींग, अत्याधुनिक बँकींग व नवयुवकांमध्ये मोबाईल बँकींग याबाबत अत्यंत महत्व असुन नव्या, व जुन्या, पिढीला नविन तंत्रज्ञानामध्ये संलग्न करण्याकरीता अस्तीत्वात असलेल्या सिल कंपनीचे सि.बी.एस. सॉफ्टवेअर प्रणाली ऐवजी किफायतशिर व संपुर्ण अद्यावत मॉड्यूल्स असलेली सीसेम सीबीएस प्रणाली घेण्याबाबत निर्णय अहवाल वर्षात घेतला आहे. तसेच ए.टी.एम. बाबत एस.बी.आय., एन.पी.सी.आय. व जिजाऊ बँकेच्या त्रिसदस्यीय व्दिकराराला मान्यता अहवाल वर्षात मिळालेली नसल्याने सदर अद्यावत ए.टी.एम. सेवा सन २०१८-१९ मध्ये कार्यान्वित होईल असा विश्वास आहे. ग्राहकांना तात्काळ फंड ट्रान्सफर, आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सेवा सध्या सुरू आहेत.

बँक दरवर्षी सामाजिक उपक्रमात सहभागी असुन **राष्ट्रमाता माँ जिजाऊंची सुराज्याची संकल्पना** घराघरात नेण्याकरीता जिजाऊ जयंती, शाहू महाराज जयंती, जिजाऊ स्मृती दिनानिमित्य जिजाऊ बुध्दीबळ स्पर्धा, विविध राष्ट्रपुरूष यांचे जयंती, स्मृतीदिन, महात्मा फुले जयंती, देश गौरव सुभाषचंद्र बोस जयंती, शहिद भगतसिंह बलिदान दिन, जागतिक महिला दिन, ग्राहक मेळावे इत्यादी कार्यक्रम आयोजित करीत असते. जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, या सामाजिक संस्थेच्या ३२ कक्षांच्या सहकार्याने **मराठा सेवा संघांच्या गाव तेथे शाखा** या अभियानातून

**''गाव तेथे जिजाऊ बँक प्रतिनिधी''** व त्याद्वारे **अर्थसंपन्न समाज निर्मीती** व व्यक्ती व्यक्तीमध्ये सहकाराप्रती ऋणानुबंध मजबुत करण्याकरिता २१ व्या शतकातील द्रष्टेयुगपुरुष व बहुजन उद्धारक **समाजशिल्पी अभियंता मा. पुरुषोत्तम खेडेकर संस्थापक मराठा सेवा संघ** यांचे कार्य सिध्दीस नेण्याच्या स्वप्नांना बँकींग क्षेत्रातील फायनांशियल इन्क्लुजन द्वारे समाजाचा मोठा घटक बँकींग क्षेत्राद्वारे विकसीत करण्यावर बँक अधिक लक्ष देणार आहे. अहवाल वर्षात जिजाऊ बँकेने सभासदाचे हित व जिजाऊ कल्याण निधी अंतर्गत बँकेच्या दिवंगत झालेल्या ७ सभासदांना ७०००० रूपये अर्थिक मदत केली आहे. बँक सभासदांचा नैसर्गिक, अपघाती मृत्यु झाल्यास दहा हजारांची मदत तात्काळ करीत आहोत.

अहवाल वर्षात बँकेची स्थिती भक्कम होत असल्याची खात्री अहवालातील संलग्न अनेक आर्थिक लेख्यांवरून अधिक स्पष्ट होईल. बँक सातत्याने स्थापने पासुनच सभासदांना लाभांश दरवर्षी जाहीर करित असते. नागरी सहकारी बँक उत्तम नियोजित व चांगल्या बँकांना रिझर्व बँक विविध निकषांच्या आधारावर लाभांश वितरित करण्याची अनुमती देते. अनेक नागरी बँका लाभांश नफा नसल्याने वाटप करीत नाही. परंतु आपली बँक आपणास माहिती आहे. सातत्याने नफ्यामध्ये असल्याने चालुवर्षी १२% लाभांश प्रस्तावित करीत आहे. इमारत बांधकामाकरीता एकुण नफाच्या ३% देण्याबाबत सभासदांना विनंती आहे. बँकेच्या यशात सभासदांचे हितचिंतकांचे व असख्य जिजाऊ परिवाराशी जुळलेल्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार.

रिझर्व बँकेच्या मालेगन समितीने नागरी सहकारी बँकांवर संचालक मंडळा व्यतिरिक्त विशेष ज्ञान व प्रातिक्षिक अनुभवाने परिपुर्ण असलेले व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्याकरीता विचार सुरु केला आहे. एकुण १०० कोटी असलेल्या नागरी सहकारी बँकाना एक वर्षाच्या आत पाच सदस्याचे नविन व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्या बाबत निर्देश आहेत. बँकेच्या सभासदांनी निवडुण दिलेल्या संचालक मंडळाच्या व्यतिरिक्त प्रामुख्याने कर्ज प्रकरणाची छाननी, कर्ज समिती कडे शिफारस व अनुत्पादीत कर्जाच्या वसुलिकरीता कार्यवाही, निधी गुंतवणुक, जोखिम व्यवस्थापन इत्यादी करीता अतिरिक्त व्यवस्थापन मंडळ स्थापल्यामुळे बँकेच्या खर्चामध्ये भविष्यात वाढ होणार आहे. या करिता सर्व नागरी बँकांनी दुहेरी नियंत्रण नको व संचालक मंडळा अंतर्गत विविध समित्या असल्याने सदर कार्यवाहि स्थगित ठेवण्याची विनंती विविध संघटनांच्या माध्यमातुन आर.बी.आय. कडे केलेली आहे. तेव्हा सदर व्यवस्थापक मंडळाची संकल्पना तुर्त स्थागित आहे.

जिजाऊ बँक आर्थिक निर्भरता, युवकाना स्वयंम रोजगार, उद्योगद्रष्टे कर्तबगार व उधमशिल युवक देशाच्या राष्ट्राच्या समाजाच्या अर्थसंपन्न समाजनिर्मीती करीता सदैव कार्यरत राहावे व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे **''आम्हीची घडलो तुम्हीबी बहूजनांनो उद्यमशिल घडाना''** हे उद्दिष्ट सफल करण्यास बँकेची सदैव आर्थिक मदत बँकेच्या कार्यक्षेत्रात सर्व भारतीयांना राहील. तेव्हा सहकारांच्या या स्वप्नांना आर्थिक क्षेत्रांमध्ये कितीही आक्रमक स्पर्धा, अनिश्चित आर्थिक मंदीची स्थिती असतांना बँकेस नविन संधी शोधण्यासाठी आपली सक्रीय साथ मिळेल हा संचालक मंडळाला विश्वास आहे. समाजाचे व राष्ट्राचे भविष्य उज्वल करण्यास सहकाराच्या माध्यमातुन उत्तम सहकार ध्येयाप्रती आम्ही सर्वजन कटिबध्द होऊ या!
बँकेच्या यशामधील सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक यांचे कृज्ञतापूर्वक आभार!


**संचालक मंडळाचे वतीने**
आपला स्नेहांकित,
**इंजि. अविनाश अं. कोठाळे**
(M.I.E. CIVIL, L.L.B, A.D.I.M, D.M.M)
अध्यक्ष
जिजाऊ कर्मशियल को-ऑप. बँक, लि. अमरातवती.

# बँकेच्या आर्थीक प्रगती बाबत संक्षिप्त

* भागभांडवल :


सन २०१७-२०१८ या आर्थीक वर्षामध्ये बँकेच्या भागभांडवलामधे रु. ७००.९७ लक्षा वरुन रु. ७९३.३५ लक्ष वाढ झाली असुन सभासद संखेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वाढी संबंधातला तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे असुन सभासद संख्येमधे सदर वाढ निर्धारित लक्ष १०% पेक्षा जास्त आहे. सातत्याने वाढ हि बँकेच्या विश्वसनियतेचे प्रतीक आहे.

| वर्ष | सभासद संख्या | वाढ % | भागभांडवल | वाढ % |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ६७०५ | ८.९७ | ७००.९७ | १२.५५ |
| २०१७-१८ | ७०५० | ५.१५ | ७९३.३५ | १३.१८ |
| प्रत्यक्ष वाढ | | | ९२.३८ | |




जिजाऊ बँकेचे भागभांडवल रक्कम (रु. लक्ष)

art Showing Share Amount Position of Jijau





| आर्थिक वर्ष | सभासद संख्या | भाग भांडवल | वाढ % |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | ७०५० | ७९३.३५ | १३.१८% |
| २०१६-१७ | ६७०५ | ७००.९७ | १२.५५% |
| २०१५-१६ | ६१९० | ६२२.८० | १५.२५% |
| २०१४-१५ | ५६९० | ५४०.४० | १२.६४% |
| २०१३-१४ | ५१७० | ४७९.७६ | १४.४७% |

* ठेवी :

बँकेचे ठेवीवरील व्याजदर महत्तम रु. ८ ते ९% पर्यंत असल्याने चालुआर्थिक वर्षामध्ये ठेवी मागील वर्षाच्या रु. १७,८८८ लक्षावरुन रु. २०९८७ लक्ष झालेल्या आहेत. ठेवी मध्ये होणारी वाढ ही १२.८५ टक्के आहे. परंतु त्या तुलनेत कर्ज वाढ झाली नाही. या बाबत भागधारकांनी अभ्यास पुर्ण आकलन करुन चांगले परतफेड क्षमता असलेले कर्जदार बँकेस आवश्यक असल्याने मदत करावी.

जिजाऊ बँकेच्या ठेवी
(रु. लक्ष)





जिजाऊ बँकेचे प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्तावरुन अधिक स्पष्ट होईल.

| वर्ष | सभासद | भागभांडवल लक्ष रु. | राखीव व इतर निधी लक्ष रु. | ठेवी लक्ष रु. | कर्ज लक्ष रु. | गुंतवणूक लक्ष रु. | खेळते भांडवल लक्ष रु. | निव्वळ नफा लक्ष रु. | लाभांश | सीआरएआर | नेट एनपीए रक्कम | ऑडीट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ५१७० | ४८० | १८१३ | १२३१४ | ७३५६ | ४९६४ | १४८८१ | १५९.४३ | १५% | ३२.६३% | ० | 'अ' |
| २०१४-१५ | ५६९० | ५४० | २०९६ | १४११४ | ८३१४ | ७०४४ | १७०११ | १८४.८१ | १५% | ३२.४६% | ० | 'अ' |
| २०१५-१६ | ६१९० | ६२३ | २०३४ | १५४९३ | १००५४ | ६७५३ | १८७३८ | १७५.११ | १२% | १८.४०% | ० | 'अ' |
| २०१६-१७ | ६७०५ | ७०१ | २४५५ | १७८८८ | १०९२८ | ८४३१ | २२४१७ | २५०.९७ | १२% | १८.००% | ० | 'अ' |
| २०१७-१८ | ७०५० | ७९३ | २९२१ | २०९८७ | १२४९८ | ८१२३ | २४७९७ | २३४.२६ | १२% (प्रस्तावित) | १७.३८% | ० | 'अ' |

*** ठेवीदारांचे सुरक्षिततेकरीता विमा योजना :**


ठेवीदारांच्या ठेव सुरक्षेकरिता रिझर्व बँकेच्या उपक्रमा अंतर्गत रु. १ लक्षापर्यंत ठेव विमा काढण्यात येतो. डि.आय.जी.सी.एस. प्रिमियम नियमीतपणे बँक जून व डिसेंबरच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या सर्व ठेवीवर अर्धवार्षिक हप्त्याने विमा प्रिमियम जमा करते. अहवाल वर्षात रु. २०.३२ लक्ष प्रिमियम भरलेला आहे. नॅफकॅब या देशपातळीवरील संस्थेने सदर विमा सहकारी बँकाकरीता रु. ५ लक्षापर्यंत काढण्याबाबत विनंती केली आहे.

*** शासकीय प्रतिभुती गुंणवणूक :-**




रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व जून २०१७ ला जाहीर झालेल्या पत धोरणा नुसार तरलता राखण्याकरीता १९.५०% गुंतवणूक ही शासकीय प्रतिभुतीमध्येच करणे अनिवार्य आहे. अहवाल वर्षत बँकेची एकुण गुंतवणूक रु. ८५२३.३२ लक्ष आहे. यापैकी शासकीय प्रतिभूतीमधील गुंतवणूक रु. ५७९२.६५ लक्ष, असुन गुंणवणूक प्रमाण २९.३८ टक्के आहे. विविध बँका मधील असंविधानिक गुंतणूक रु. २२०५.५९ लक्ष आहे. मागील अर्थिक वर्षामध्ये बँकेच्या एकुण गुंतवणूकीवर रु. ५९२.९६ लक्ष रुपये इतके व्याज मिळाले आहे. शासकिय प्रतिभुतीमधे गुंतवणुक रिझर्व बँकेने अनिवार्य केली परंतु जास्त व्याज दराच्या ठेवी स्विकारुन, सरकारच्या कमी व्याजाच्या प्रतिभुतीमधे गुंतवणुक व विक्री केल्यास तोटा व जोखीम आहे.

## जिजाऊ बँकेने केलेले कर्जवाटप (रु. लक्ष)




*** अहवाल वर्षातील कर्ज वितरण :**

बँकेचे अहवाल वर्ष अखेर ३६९२ सभासदांना एकूण रु. १२७९७.६७ लक्ष कर्ज वाटप केलेले आहे. मागील वर्षाच्या तुलनेमधे रु. १८६९.९१ लक्ष ( १७.११ % ) वाढ झालेली आहे.

| अ.क्र. | कर्ज रक्कम (रुपये मध्ये) | एकूण कर्जदार | टक्केवारी | कर्ज वाटप | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २५००० पर्यंत | ५८३ | १५.७९ | १७४.६२ | १.३६ |
| २. | २५००१ ते ५०००० पर्यंत | ७४९ | २०.२९ | १२३.७९ | ०.९७ |
| ३. | ५०००१ ते १००००० पर्यंत | ७४९ | २०.२९ | ७३०.३९ | ५.७१ |
| ४. | १००००१ ते ५००००० पर्यंत | १२०२ | ३२.५६ | २२१५.९० | १७.३१ |
| ५ | ५००००१ ते १०००००० पर्यंत | १९७ | ५.३४ | १३९५.७७ | १०.९१ |
| ६. | १०००००१ ते २५००००० पर्यंत | १२८ | ३.४६ | २०३५.२७ | १५.९० |
| ७. | २५००००१ चे वरील | ८४ | २.२७ | ५७२१.९३ | ४४.७१ |
| | एकूण | ३६९२ | १००.०० | १२७९७.६७ | १००.०० |

बँकेने अहवाल वर्षात एकूण ३६९२ कर्जधारकांना रु. १२७९७.६७ लक्ष कर्ज वाटप केले आहे. सदर कर्जाचे ठेवीशी गुणोत्तर ६४.९२ टक्के आहे. रु. १० लक्षाचे वर कर्ज वितरण २१२ कर्जदारांना केले व त्याचे प्रमाण एकूण कर्जाशी ६०.६१ टक्के आहे. बँकेला मोठा कर्जदारांचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी जास्त सभासदांचा कर्जामध्ये सहभाग घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मागेल त्याला मागणी प्रमाणे कर्जदारांच्या परतफेडीची सक्षमता तपासुन शिघ्र कर्जप्रमाणानुसार रु. १.५० कोटी पर्यंत वैयक्तीकरित्या देण्यात येईल

## बँकेची कर्ज प्रकारानुसार कर्ज वाटणी खालील प्रमाणे आहे. (आकडे लक्षात)

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | एकुण कर्जासोबत प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅश क्रेडीट | १७२१.८६ | २०४३.७६ | २६४९.४१ | २९८६.८८ | ३३०४.९१ | २५.८२ |
| २. | गृह तारण | ८९३.०७ | ८३१.७६ | १०१७.५२ | १०३४.८६ | १०६०.९८ | ८.२९ |
| ३. | वैयतिक तारण | १०३३.४८ | ७४२.७६ | ५५१.२८ | ३९९.५३ | ३८४.५९ | ३.०१ |
| ४. | एमएसएमई (सेवा) | ४४०.६१ | ७३२.६७ | ११९८.९४ | १७७४.३२ | २८९२.५२ | २२.६० |
| ५. | वाहन कर्ज | ४४८.३६ | ४४७.४३ | ४८४.१३ | ४४६.११ | ३८६.७४ | ३.०२ |
| ६. | वैयक्तीक | १८४.११ | २९६.४१ | २९९.३० | ३६९.५५ | ३८३.५८ | ३.०० |
| ७ | मुदतीठेव तारण | ३२५.४१ | ३२७.९९ | ३११.६१ | ३०६.८७ | ३२६.६१ | २.५६ |
| ८. | वेअर हाऊस कर्ज | २२.३३ | ९.२१ | १७.३५ | २३.२५ | २८.५७ | ०.२२ |
| ९. | इतर स्टाफ कर्ज | ०.४७ | – | ८.५७ | २७.२२ | ३१.४० | ०.२५ |
| १०. | शेती कर्ज | ६२५.४० | ६९९.१६ | ८८८.०२ | ८३७.६४ | ८११.९७ | ६.३४ |
| ११. | शैक्षणिक कर्ज | ३०.९४ | ३५.४३ | ४४.६८ | ४३.८९ | ३९.९० | ०.३१ |
| १२. | सोने तारण कर्ज | १०७.६३ | ६२४.०१ | ६०२.७३ | ६४८.६१ | ७५०.५३ | ५.८६ |
| १३. | मालमत्ता तारण कर्ज | ६८४.६८ | ९७१.८८ | १३८७.८३ | १५५५.७३ | १८२९.७२ | १४.३० |
| १४ | ओडी एफ.डी.आर | २०२.०८ | २०८.४४ | १७६.९९ | २६६.३४ | २३२.३९ | १.८१ |
| १५. | एमएसएमई (उद्योग) | १७४.७९ | २२५.६७ | ३७५.६३ | ४४८.९३ | ३३४.०५ | २.६१ |
| | एकूण | ७३७५.७६ | ८३१४.६२ | १००५४.०९ | १०९२७.७७ | १२७९७.६७ | १००.०० |
| | कर्जामध्ये झालेली वाढ | १६.७७ % | १२.७३ % | २०.९२ % | ८.६९ % | १७.११ % | |

**सन २०१६-१७ च्या तुलनेत अहवाल वर्षात कर्जाची केवळ १७.११ टक्के वाढ झाली आहे.**

* **कर्ज वितरणाची महत्तम मर्यादा :**

व्यक्तीला एकुण भागभांडवलाचे प्रमाणात १५ टक्के व व्यक्ती समुहाला (Group) ४० टक्के महत्तम सिमा रिझर्व मार्गदर्शक तत्वानुसार आहे. आपल्या बँकेने २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता कर्जमर्यादा रु. १५० लक्ष व रु. ४५० लक्ष अशी निर्धारीत केलेली होती. त्या,मध्ये सुधारणा करुन समुहाला रु. ४ कोटी निर्धारित केली आहे. जास्त व्यक्तींचा कर्जात सहभाग केल्यास **सहकारात सर्वांचा विकास सर्वांची समृध्दी आहे.**

* **संशयीत व बुडीत कर्जासाठी तरतूद :**

मागील वर्षापर्यंत बँकेची संशयीत व बुडीत कर्जासाठीची तरतूद रु. १०३९.०२/- लक्ष इतकी होती त्यामध्ये रु. ११०/- लक्ष तरतुद करुन रु. ११५०.९० लक्ष आर्थिक तरतुद आहे. संशयीत व बुडीत कर्जनिधी, उत्पादीत कर्जे, अनुउत्पादित कर्जे D-1, ते D-3 पर्यंत पुर्ण तरतुद करुन सदरचा निधी अधिक असल्यामुळे नक्त अनुत्पादीत संपतीचे प्रमाण शुन्य टक्के आहे. कोणतेही कर्ज खाते ९० दिवसापेक्षा अनुत्पादीत राहु नये या कडे नियमित कर्ज परतफेड होणे अत्यावश्यक आहे. मोठ्या कर्जदारानी स्वतःचा विकास करत असतांना बँकेचे कर्ज दिलेल्या मुदतीतच नियमितपणे कर्ज परतफेड केली पाहीजे ही अपेक्षा.

* **सामोपचार पध्दतीने कर्ज परतफेड करणे :**

बँक दरवर्षी महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार काही अंशी थकीत खात्यामध्ये सामोपचार पध्दतीचा लाभ देवून वसुली करित आहे. चालु वर्षात एकुण १५ कर्जदार सभासदांना सदर योजनेचा लाभ घेतला आहे. बँकेचे अनुत्पादक कर्ज कमी करणे हा उद्देश सामोपचार पध्दतीने परतफेड योजनेचा आहे. थकीत कर्जदारांनी या योजनेचा लाभ घेऊन सहकार्य करावे.

* **संचालक व त्यांच्या नातेवाईकाकडील कर्जे :**

बँकेने बँकेच्या संचालक मंडळातील कोणत्याही सदस्यास किंवा त्यांच्या नातेवाईकास कोणतेही कर्ज दिलेले नाही व अशा प्रकारे बँकेने रिझर्व बँकेच्या निर्देशाचे तंतोतंत पालन केलेले आहे.

* **इनकम टॅक्स व इतर टॅक्स :**

बँकेने चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता अग्रीम आयकर म्हणून रु. १५५.०० लक्ष भरलेला आहे. अहवाल वर्षात आयकर आयुक्त नागपुर यांचेकडुन सन २००६-०७ ते २०१२-१३ पर्यंत आयकर कमी भरल्या बाबत नोटिस प्राप्त झाल्या त्या नुसार अपिल करण्यात आल्याने या मध्ये रु. १७७.५० लक्ष परतावा बँकेस प्राप्त झाला सदर कार्यालयाने सन २०१२ ते २०१६ चे रिटर्न उशिरा प्राप्त झाले त्यावर पुन्हा नोटिसेस दिल्या असुन आयुक्ताकडे पुन्हा अपील दाखल केले. त्याचा बँकेचे बाजुने निकाल लागलेला आहे.

* **नफा व नियोजन :**

अहवाल वर्षामध्ये बँकेने कर्ज रक्कमेवर व्याज रु. १६२४.७२ लक्ष, गुंतवणूकीवर रु. ५०.११ लक्ष व प्रतिभूती विक्रिवर नफा रु. २.२० लक्ष व एकुण रु. २२७३.८२ लक्ष मिळविलेले आहेत. त्यामधुन ठेवीवरील व्याज, इतर खर्च करुन **बँकेला चालु वर्षामधे रु. २३४.२६ लक्ष निव्वळ नफा झालेला आहे. प्रशासकिय प्रतिभुतिमधे सध्या संपुर्ण पणे मंदी असुन सेकंडरी मार्केट मधिल दर कमी असल्याने या मध्ये तोटा आहे.**

* **लाभांश :**

चालू वर्षासाठी बँकेने **१२ % लाभांश** प्रस्तावित केलेला आहे. बँकेने मुख्य कार्यालयाच्या बांधकामाची सुरुवात केलेली आहे. ह्या इमारतीच्या बांधकामासाठी प्रत्येक सभासदाचे वैयक्तिक सहकार्य अपेक्षीत आहे.

* **संवैधानिक लेखापरिक्षण :**

आपल्या बँकेचे वर्ष २०१७-१८ साठीचे लेखापरिक्षण मे. साज ॲन्ड असोसिएट्स चार्टड अकाउंट, पुणे या संस्थेने केलेले असुन त्यांनी **आपल्या बँकेला ''(अ)'' ऑडीट वर्ग दिलेला आहे.**

*** कर्मचारी, संचालक प्रशिक्षण :**

बँकेच्या सक्षम व निकोप वाढीसाठी संचालक, सोबतच प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी असणे आवश्यक असतात या महत्वाच्या मुद्यावर बँकेने लक्ष केंद्रीत करुन चालु वर्षामध्ये प्रशिक्षणावर रु. १.३० लक्ष इतका खर्च केलेला आहे. एकूण ७८ कर्मचारी, व ७ संचालकांनी प्रशिक्षण घेतले आहे. त्याचप्रमाणे सर्वच कर्मचाऱ्यांना ज्ञानवर्धनाचा लाभ होण्याचे दृष्टीने अमरावती येथे श्री. गिरिष पोळेकर जनता सहकारी बँक पुणे व मा.श्री बाळासाहेब वैद्य यांच्या तर्फे प्रशिक्षण घेऊन कार्यक्रम राबविण्यात आला. भागधारकांना सुध्दा प्रशिक्षण देण्याचा मानस असुन प्रशिक्षणा करिता बँकेने ताळेबंदामध्ये विशेष तरतुद केलेली आहे. बँकेमध्ये सध्या एकूण स्थाई, अस्थाई, व कंत्राटी कर्मचारी आहेत. कर्मचाऱ्यांचे वेतनावर रु. १८४.८० लक्ष खर्च आहे.

*** मान्यवरांच्या भेटी :**

अहवाल वर्षात मा. श्री . सुनिल भाऊ देशमुख आमदार अमरावती, श्री. अरविंद देसाई, सहआयुक्त, आयकर विभाग, अमरावती. श्री विवेक साळवे अधिक्षक अभियंता, श्री तेजस्विनी वानखडे, वरिष्ठ भूवैज्ञानिक, श्री रविंद्र वानखडे, कार्यकारी अभीयंता, मा. श्री हेमंत पवार आयुक्त मनपा, श्री. नरेंद्र वानखडे उपायुक्त म.न.पा अम., मा.सौ. संध्या टिकले उपमहापौर, अमरावती, श्री. सत्यजित ठोसरे, विभागिय व्यवस्थापक, एम.ए.आय.डी.सी. अम., व श्री. प्रशांत रोडे मुख्याधिकारी नगरपालिका चिखलदरा इत्यादी मान्यवरांनी बँकेस सदिच्छा भेटी दिल्यात.

*** सामाजिक जाणीव व उपक्रम :**

सामाजीक जाणीव ठेवून बँकेने विविध उपक्रम सुरु केलेले आहेत. **भागधारकांना कोणत्याही प्रकारे नैसर्गीक अथवा अपघाती मुत्यू आल्यास त्यांच्या कुटूंबांना रु. १०,००० अर्थ सहाय्य म्हणुन दिले जाते.** अहवाल वर्षात बँकेने ७ मृतभागधारकांचे वारसदारांना रु. ०.७० लक्ष अर्थ सहाय्य मंजुर करुन वितरित केले.

त्याचप्रमाणे **महिलांना उद्योगामध्ये प्राधान्य व प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने बँकेने महिलांकरीता जास्तीतजास्त कर्ज रु. २.०० लक्ष पर्यंत १०% व्याजदराने नविन उद्योग सुरु करण्याकरीता कर्ज देण्याचे धोरण अवलबविले आहे.** चालु अर्थिक वर्षामध्ये बँकेने एकुण २ महिलांना या योजनेचा लाभ दिलेला आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी बँकेने १२ जानेवारी हा दिवस ''जिजाऊ जन्मदिन सोहळा'' म्हणून मोठ्या उत्साहाने व उल्हासाने साजरा केला.

अमरावती शहरातील मिनी बायपास रोडवर जिजाऊ पुतळा सौंदर्यीकरणाठी बँकेने पुढाकार घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालया समोरील माँ जिजाऊ पुतळा परिसर सौंदर्यीकरण व देखभालीचे काम बँकेने महानगरपालिकेकडून स्वतःकडे घेतलेले आहे. ग्रामीण भागातील छोट्या छोट्या उद्योगांना शेतीपुरक उद्योगांना, शहरातील छोट्या व्यवसाईकांना चालना देण्याच्या उद्देशाने बँक प्रयत्नशील आहे

# जिजाऊ बँकेचे सुधारित व्याजदर


| अ.क्र. | कर्ज प्रकार | व्याज दर दि. ०१/०१/२०१८ पासुन लागू |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक कर्ज | |
| | अ) रु. १० लक्षापर्यंत | १२% |
| | ब) रु. १० लक्ष ते ५० लक्षावरील | १३% |
| २ | सुवर्ण कर्ज | ११% |
| ३ | वेअर हाऊस रिसीप्ट | १२% |
| ४ | शेती कर्ज (विकास) | १२% |
| ५ | कंत्राटदाराची कर्जे | १४% |
| ६ | वाहन कर्जे | |
| | अ) रु. १० लक्षापर्यंत (नविन गाडी) | १०% |
| | ब) रु. १० लक्षावरील (नविन गाडी) | ११% |
| | क) जुनी कार/ इतर वाहन | १०% |
| | ड) दुचाकी वाहन | १०% |
| | ई ) व्यावसाईक वाहन | १२% |
| ७. | पर्सनल कर्जे व (NSC,KUP.LIC) च्या गहाणावरील | १२ |
| ८. | घर खरेदी/बांधणी | १०% |
| ९. | घरदुरुस्ती | १२% |
| १०. | शैक्षणिक कर्जे | १२% |
| ११. | लोन अगेंस्ट प्रॉपर्टी/मॉर्टगेज लोन) | १४% |
| १२. | लोन अगेन्स्ट डिपॉझीट ज्या रकमेवर दिला जातो त्या व्याज दरापेक्षा २% अधिक | |
| १३. | मेडीकल व्यावसायीकांचे कर्ज (डॉ. जी. योजना) | |
| | अ) महिला डॉ. | ११% |
| | ब) पुरुष डॉ. | १२% |
| १४. | उद्योजक महिला करीता (रु. २ लक्ष पर्यंत) | १०% |
| १५. | व्यावसायीक बांधकाम कर्जे | १५% |

# ठेवीचे व्याज दर

| अ.क्र. | ठेवीचे प्रकार | दि.०१/०१/२०१८ पासुन लागु |
|---|---|---|
| अ) | बचत ठेव खाते | ४.०० % |
| | करंट खाते | ०.०० % |
| ब) | मुदती ठेवी खाते | |
| १. | ८ दिवस ते १४ दिवसापर्यंत | ५.०० % |
| २. | १५ दिवस ते ९० दिवसापर्यंत | ५.०० % |
| ३. | ९१ दिवस ते १७९ दिवसापर्यंत | ६.०० % |
| ४. | १८० दिवस ते १ वर्षापर्यंत | ६.५० % |
| ५. | १ वर्ष ते ३ वर्षापर्यंत | ७.५० % |
| ६. | ३ वर्षावरील कालावधीकरीता | ७.०० % |
| ७. | जिजाऊ महिला ठेव योजना १५ महिने | ८.००% (सरळ व्याज) |
| ८. | शहाजी महाराज वित्त वृध्दी योजना २४ महिने | ९.०० % (सरळ व्याज) |

टिप :- ठेवीवर जेष्ठ नागरिक, सहकारी संस्था/ट्रस्ट यांचे ठेवींवर व आजी/माजी सैनिकांचे ठेवीवरील व्याज दरा व्यतिरिक्त अर्धा टक्का व्याजदर अधिक दिला जाईल. (अ.क्र १ ते ६ पर्यंत लागु)

## सन २०१७-१८ चे उत्पन्न व खर्च दर्शविणारा आलेख



# परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नाव | : | जिजाऊ कमर्शियल को-ऑप.बँक लि. अमरावती. |
| नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | : | १ ला माळा खत्री कॉम्प्लेक्स, |
| | : | वालकट कंपाऊंड, अमरावती. |
| नोंदणीकृत क्रमांक व तारिख | : | ऐटीआय/ऐटीआय/बीएनके (ओ)/३१३/१९ |
| रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख | : | दि. ३१ मार्च १९९९ |
| सभासद संख्या | : | ७०५० |
| ३१ मार्च २०१८ अखेरचा तपशिल | : | आकडे लाखात |
| वसुल भागभांडवल | : | रु. ७९३.३५ लक्ष |
| एकुण गंगाजळी व निधी | : | रु. २९२०.६९ लक्ष |
| ठेवी | : | रु. २०९८७.०० लक्ष |
| बचत ठेवी | : | रु. ३६३४.७४ लक्ष |
| चालू ठेवी | : | रु. ९८८.०४ लक्ष |
| मुदत ठेवी | : | रु. १४७८८.६६ लक्ष |
| कर्जे तारणी | : | रु. १२४१४.१३ लक्ष |
| विनातारणी | : | रु. ३८३.५४ लक्ष |
| एकुण कर्जाचे अग्रक्रम कर्जासोबत प्रमाण | : | ४३.६१ % |
| एकुण कर्जाचे दुर्बल घटकासोबत प्रमाण | : | १२.२९ % |
| उचललेले कर्ज जिल्हा मध्यवर्ती बँक | : | निरंक |
| गुंतवणूक | : | रु. ८५२३.३२ लक्ष |
| ऑडीट वर्ग | : | 'अ' |
| नफा (२०१७-१८) | : | रु. २३४.२६ लक्ष |
| एकुण कर्मचारी | : | ९५ |
| अधिकारी वर्ग | : | ४२ |
| लिपीक वर्ग | : | ३२ |
| शिपाई | : | २१ |
| खेळते भांडवल | : | रु. २४०५२.५९ लक्ष |

## उत्पन्न देणाऱ्या मालमत्तेचे प्रमाण :

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | एकुण कर्ज / एकुण मालमत्ता | : | ५३.२१ % |
| ब) | एकुण कर्ज + गुंतवणुक / एकूण मालमत्ता | : | ८८.६४ % |

## निव्वळ दुरावा प्रमाणपत्र :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | व्याजाचे उत्पन्न / उत्पन्नक्षम मालमत्ता | : | १०.४१ % |
| ब) | व्याजाचे खर्च / उत्पन्नक्षम मालमत्ता | : | ६.४२ % |
| | आर्थिक गाळा | | ३.९९ % |

**व्यवसायिक प्रमाणके दि. ३१ मार्च २०१८**

| विवरण | आदर्श प्रमाणके | प्रत्यक्ष प्रमाणके |
|---|---|---|
| भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) | किमान ९ % | १७.३८ % |
| भागभांडवल वाढीचे प्रमाण | किमान २ ते ५ % | १३.१८ % |
| रिझर्व्ह फंड | किमान ४ ते ६ % | ११.७० % |
| ठेवींचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ८५ % | ७८.६५ % |
| कर्जाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ६५ % | ५१.२३ % |
| इतर बँकेची कर्जे व देणीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ३ % | ५.६३ % |
| गुंतवणूकीचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण (S.L.R) | किमान १९.५० % | ३४.०५ % |
| एकुण उत्पन्नाचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल १० % | ९.४५ % |
| व्यवस्थापकीय सरासरी खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल २.५ % | १.५२ % |
| ढोबळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | कमाल ५ % | २.५२ % |
| निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण | किमान १ % | ०.९७ % |
| ढोबळ एनपीएचे एकुण कर्जाशी प्रमाण (Gross NPA) | किमान ७ % | ६.१४ % |
| निव्वळ एनपीएचे एकुण कर्जाशी प्रमाण (Net NPA) | किमान ३ % | ०.०० % |
| रिटर्न ऑन असेट | किमान १.५ % | २.५३ % |
| नेट इन्टरेस्ट मार्जीन | किमान ३ % | ३.९१ % |
| इन्ट्रेस्ट पेड | किमान ४ ते ५ % | ६.४२ % |
| सिडी रेशो (C.D. Ratio) | कमाल ६५ ते ७० % | ६४.९२ % |
| कॅश व बँक बॅलन्स (सिआरएआर) | किमान ४ % | ४.८३ % |
| एकुण व्यवसायाशी कर्मचारी खर्च | कमाल १.५ % | १.१७ % |
| प्रती सेवक व्यवसाय रुपये | किमान २५० लक्ष | ३४१.४७ लक्ष |

आदर्श प्रमाणके राखण्याकरिता संचालक मंडळ कटीबध्द आहे.

* विषय क्र. ३ :- नफ्याने विनीयोजन खालील प्रमाणे प्रस्तावीत बँकेचे उपविधीतील अनुच्छेदा नुसार आहे.

| | | |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चा एकूण | : | बँक प्रस्तावित (लक्ष रुपये) |
| **शुध्द निव्वळ नफा (ताळेबंदाप्रमाणे)** | : | रु. २३४.२६ लक्ष |
| **नफ्याचे विनियोग** | | |
| **राखीव निधी** एकुण नफ्याच्या २५ % (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व दुरस्ती कायद्या प्रमाणे) | : | रु. ५८.५६ लक्ष |
| **लाभांश १२ % (सन ३१ मार्च २०१८ चे एकूण रुपये ७९३.३५ लक्ष चे भागभांडवलावर)** | : | रु. ९५.२० लक्ष |
| **एकूण शिल्लक** | : | **रु. ८०.५० लक्ष** |
| **उर्वरीत नफा** | : | **रु. ८०.५० लक्ष** |
| **इमारत निधी** | : | **रु. ८०.५० लक्ष** |
| **शिल्लक एकूण** | | **निरंक** |

## BANK CONTINUES WITH ITS CONSISTENT PERFORMANCE AS ON 31.03.2018

| Sr.No. | Particular | Rs. IN Lac |
|---|---|---|
| 1 | Share Capital | **793.35** |
| 2 | Investment | **8523.32** |
| 3 | Business Mix | **32509.50** |
| 4 | Deposits | **19711.83** |
| 5 | Advances | **12797.67** |
| 6 | Operating Profit | **582.42** |
| 7 | Net Profit | **234.26** |
| 8 | Working Capital | **24062.59** |
| 9 | *CRAR* | ***17.38*** |

## JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI.

### NOTES ON ACCOUNTS AS ON 31.03.2018 Disclosure As Per RBI Guidlianes

| SR. NO. | PARTICULARS | AS ON 31.03.2017 | AS ON 31.03.2018 |
|---|---|---|---|
| 1 | Capital to Risk Assets Ratio | 18.07 | 17.38 |
| 2 | Investment in (Govt. Securities/Fixed Deposits & Co.op. Bank Share) | 8438.74 | 8523.32 |
| 3 | Advance Against | -- | -- |
| | a) Real Estate | 1511.73 | 1830.00 |
| | b) Construction Business | 9034.86 | -- |
| | c) Housing | | |
| 4 | Advance Against Share & Debentures. | Nil | Nil |
| 5 | Advance to Directors & their relatives. | Nil | Nil |
| | a) Fund based | Nil | Nil |
| 6 | Cost of Deposit. | 7.23 | 6.39 |
| 7 | NPA (Audited) | | |
| | a) Gross NPA Amount | 669.19 | 832.23 |
| | percentage | 6.12 | 6.50 |
| | b) Net NPA | 0.00 | 0.00 |
| | Percentage | 0.00 | 0.00 |
| 8 | Movement in NPA's | | |
| | a) Gross NPA | +41.21 | +163.04 |
| | b) Net NPA | 0.00 | 0.00 |
| 9 | Profitability | -- | -- |
| | a) % of Interest income to working fund | 10.41 | 9.22 |
| | b) % of Non-Interest income to working fund | 0.30 | 0.23 |
| | c) % of Operating profit to working fund | 2.31 | 2.43 |
| | d) Return on Assets | 1.83 | 1.09 |
| | e) Business per employee (Deposit+Advances) | 324.00 | 342.20 |
| | f) Profit per employee | 2.26 | 2.47 |
| | g) Cost of Management | 1.76 | 3.24 |
| | h) CD Ratio. | 61.09 | 66.05 |
| 10 | Provisions made toward | | |
| | a) NPA's | 1039.02 | 1150.90 |
| | b) Depreciation in investment | 70.05 | 166.25 |
| 11 | Movement in Provisions | -- | -- |
| | a) Towards NPA's | -220.00 | 111.88 |
| | b) Towards Depreciation on investment | +21.48 | 96.02 |
| | c) Towards Standard Assets. | 154.64 | 54.64 |
| 12 | Foreign Currency Assets & Liabilities. | -- | -- |
| 13 | Deposit Insurance premium paid to DICGC | 17.41 | 20.32 |
| 14 | Bank Guarantee (Letter of Credit) etc | 06.62 | 5.38 |

(विषय क्र. २ चे प्रपत्र)

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक,लि. अमरावती.

## स्थितीविवरण - पत्रक दिनांक ३१ मार्च, २०१८ चे स्थितीवरील

| मागील वर्षीचे आकडेवारी दि. ३१.०३.२०१७ (रुपये) | देणी | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ | मागील वर्षीचे आकडेवारी दि. ३१.०३.२०१७ | येणी | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८,००,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | ८००,००,०००.०० | | १८१,७१,६९५.०० | रोकड व बँकेतील शिल्लक | | १,६८,२६,९८२.०० |
| | (रु. १००० चा एकमान ८०००० भाग) | | ७,९३,३५,०००.०० | | अ) रोकड | १,६८,२६,९८२.०० | |
| ७,००,९६,८५०.०० | वसूल भाग भांडवल | | | ७,७८,८२,४२४.९९ | ब) बँकेतील शिल्लक | | ११,९३,११,७६९.१० |
| | सभासदाकडून | ७,९३,३५,००० | | १९,८७१.८४ | अमरावती जि.म.स.बँक | ३१,१८,६११.८४ | |
| २४,५४,७७,६३३.८९ | राखीव फंड व इतर निधी | | २९,२०,६१,०११.०८ | ८७,४०७.३५ | अकोला जि.म.स.बँक | ७४,६१९.५५ | |
| ७,२४,९९,५९२.८९ | १) राखीव एवं भांडवल | ८,५८,१४,४०३.०८ | | १,१७,२७,८३४.७९ | महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक अमरावती | १,००,२६,६९७.६४ | |
| ४,१२,११,०९२.७७ | राखीव निधी | ४,७०,८३,८२२.७७ | | ४,०७,१०९.३८ | महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक मुंबई | २०,३१,५२१.३० | |
| २,५६,४९,७००.१२ | इमारत निधी | ३,३१,७१,९८०.३१ | | ६६,११,७९२.७८ | स्टेट बँक ऑफ. इंडिया, अमरावती | १२,६४,४९३.९२ | |
| ५५,५६,०००.०० | विशेष राखीव निधी ३६ U/S (VIII) | ५,७५,९०,०००.०० | | ६,१०,७३१.५६ | स्टेट बँक ऑफ. इंडिया, अकोला | ८,६७,९००.९५ | |
| ७,०१,४५,४२३.०० | २) राखीव पुंजी भागभांडवल | ७,०३,९९,१७४.०० | | १,२३,०१,६५१.२७ | आयडीबीआय बँक, नागपूर | ३१,६६,४२२.२७ | |
| १४,७७,३२१.०० | [illegible] | १४,७७,३२१.०० | | ४,३०,६२५.२१ | बँक ऑफ बडोदा, अमरावती | १२,२९,२३३.७७ | |
| ४९,६४,०००.०० | [illegible] | ४९,६४,०००.०० | | १,८८,९६३.५७ | महाराष्ट्र बँक,दर्यापूर | ४,५१,९५४.५७ | |
| २,८८,७५,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | २,९८,७५,०००.०० | | ७,२१३.५३ | युको बँक, अमरावती | ७,२१३.५३ | |
| ७०,०५,०००.०० | गुंतवणूक घसारा निधी | १,६६,२५,०००.०० | | ७,२६,७०८.७७ | एक्सीस बँक, अमरावती | १६,२७,३४२.०२ | |
| १,४३,४३,१०२.०० | [illegible] | १,६६,७६,८९३.०० | | ३,२४,६२९.१२ | एक्सीस बँक, दर्यापूर | १,६६,७६२.१२ | |
| | निधी | | | (-)७०,८६४.०० | आय.डी.बी.आय बँक, यवतमाळ | ८३,४२९.३० | |
| | | | | ७,०३,४६३.४४ | आयसीआयसीआय बँक, यवतमाळ | ९,९८,८८३.५५ | |
| ११,७८,१२,६१८.०० | ३) इतर निधी (अ) | १३,५८,७५,४४२.०० | | १६,०६,३८३.०० | आयडीबीआय बँक, अकोला | १,११,३८३.०० | |
| १०,२५,८०४.०० | कर्मचारी कल्याण निधी | १०,९८,४७५.०० | | २९०,२५,२५८.७८ | महाराष्ट्र बँक, अमरावती | १,४४,४२,६७४.२३ | |
| १०,००,०००.०० | तंत्र विकास निधी | १०,००,०००.०० | | १६,१२,२५०.०० | एस.बी.आय. [illegible] | १६,११,०८५.०० | |
| १८,३०,०००.०० | सभासद प्रशिक्षण निधी | १,८३,००,००.०० | | २,२५,५३५.२८ | एचडीएफसी बँक, अमरावती | २,८९,५५४.०८ | |
| १०,३५,०२,२५०.०० | बुडीत व संशयास्पद कर्जाचा राखीव निधी | ११,७०,५०,२५०.०० | | २,१०,४५५.५० | एचडीएफसी बँक, नागपूर | २,१०,४५५.५० | |
| १३,१५,०००.०० | जिजाऊ प्रबोधन निधी | १३,१५,०००.०० | | ७६,०७८.१२ | एचडीएफसी बँक, दर्यापूर | ८३,७२०.४१ | |
| १२,००,०००.०० | निवडणूक निधी | १२,००,०००.०० | | १,६६,८८४.८६ | एक्सीस बँक, अचलपूर | ८,८४,६६५.८६ | |
| १४,००,०००.०० | शाखा विस्तार निधी | १,०४,००,०००.०० | | ८८,७२२.६२ | एचडीएफसी बँक, अकोला | ९१,२०४.६२ | |
| ३४,८५,७४४.०० | गुंतवणूक नुकसान भरपाई निधी | ३४,२०,७२५.०० | | ७८,३८७.८४ | आयसीआयसीआय बँक, अमरावती | ८७,७८,३८९.८४ | |
| | ४) इतर निधी (ब) | | | २२४.४१ | एक्सीस बँक शाखा क्र. ७०९२ | २२४.४१ | |
| ४,७०,०००.०० | भावनात्मक मृत्यू लिंक फंड | ४,८०,०००.०० | | ६१,१०,४१२.०० | इंडसइंड बँक, अमरावती. | ७५,८१८.०० | |
| | वेलफेअर सहायता निधी | | | ३६,७९,८८७.१० | एम.एस.को.ऑप.बँक, नागपूर | ५८,९२,४०७.३९ | |
| ८,०५,१८,७२५.०० | इतर तरतूदी | | ७,६२,३७,१८४.२० | १,७७,८९,२९४.२७ | [illegible] को ऑप.बँक | ३,०८,४९,५९५.०८ | |
| ६,७७,१८,७२५.७७ | थकीत व्याजावरील राखीव निधी | ७,३५,००,१८४.२ | | १५,९२,७७७.०० | आय.डी.बी.आय.बँक, नागपूर (मिटीगल) | २,५७,२१,११२.०३ | |
| ०.०० | कर्मचारी देय रक्कम तरतूद | १५,००,०००.०० | | ९,६९,१७७.०० | आय.डी.बी.आय.,नागपूर शाखा | ११,०७,४४४.३० | |
| १,८०,००,०००.०० | आयकर तरतूद | ० | | ११,१६,५५१.०० | एस.बी.आय.चांदूरबाजार | ३,८७,२८७.२५ | |
| ०.०० | पे ऑर्डीर फी | ८,३०,००० | | ९,२२,९२५.०० | बी.ओ.एम.चांदूरबाजार | २८,३४,८७९.०० | |
| १७५,८०,०५,६०६.३५ | एकूण ठेवी | | १९७,११,८३,१७७.१९ | ६३,५०९.२४ | एस.बी.आय.यवतमाळ | ५२,८२४.२५ | |
| ९३,०४,३०,११८.९५ | मुदत ठेवी | ९५,२३,१६,६२५.७७ | | ८,४२,८७,४७८.०० | गुंतवणूक | | ८५,३३,३१,५७६.०० |
| १,२४,०२,८६१.०० | दैनंदिन ठेव योजना | ३,०७,३८,८२०.०० | | ७७,९०,८७,६६२.०० | [illegible] गुंतवणूक | ७७,९२,६४,८१२.०० | |
| ३१,०५,११,४१२.०० | बचत ठेवी | ३६,३४,७४,१४४.४० | | ७७,७४,२८,४६२.०० | अ) शासकीय रोखे | ७७,६२,५४,८१२.०० | |
| ८,७४,०१,६६६.९९ | चालू ठेवी | ९,८८,०३,७७०.८४ | | १५,९५,२००.०० | ब) [illegible] | ३०,१०,०००.०० | |

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक,लि. अमरावती.

## स्थितीविवरण - पत्रक दिनांक ३१ मार्च, २०१८ चे स्थितीवरील

| मागील वर्षाचे आकडेवारी दि. ३१.०३.२०१७ (रुपये) | देयता | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ |
|---|---|---|---|
| ११,३०५.०० | लिकींग डिपॉझीट | ० | |
| १३५,७५,८९,४०७.९१ | मुदती ठेवी | १५७,८८,६६,५२१.९२ | |
| १४,९८,९१३.२४ | ठेव व्याज | | २,०१,८०,३८३.२४ |
| | बिल्स पेंॲबल (कान्ट्रा) | | |
| | आऊटवर्ड बिल्स | | |
| | कर्जावरील अतिदेय बाकी | | |
| | वि.वि. | | |
| ७८,१०,४८०.०० | पे-ऑर्डर देय रक्कम | | |
| | देयता | | ६३,६६,९९५.०० |
| ७७,७८,७५०.२६ | इतर देयता | | ५४,७०,२७७.६१ |
| ११,१०,७५९.०० | देय लाभांश २०१२-१३ | २६,४०,६६६.०० | |
| २,५४,९९६.०० | सुरक्षा ठेव | २,५४,९९६.४ | |
| ११,२५,८२१.६० | टि.डी.एस. कॉन्ट्रॅक्टर | १,२२,११०.०० | |
| २,१३०,७०८.०० | अनामत डिमांड ड्राफ्ट | २१,६२,०३८.०० | |
| ०.०० | भाग अनामत रक्कम | १,३६,३०५ | |
| २,७९,६००.०० | कर्मचारी भविष्य नि.निधी | १,४४,७८३ | |
| ०.०० | प्रोफेशनल टॅक्स | १४,७०० | |
| | देय लाभांश | | |
| ५,११,३९८.०० | देय लाभांश २०१४-१५ | ०.०० | |
| ८,३१,१७५.२६ | देय लाभांश २०१५-१६ | ७,७१,१११.२६ | |
| ०.०० | देय लाभांश २०१६-१७ | ७,३४,७११.०० | |
| ०.०० | देय केंद्रीय जी.एस.टी | ६२,४७५.७८ | |
| ०.०० | देय राज्य जी.एस.टी. | ६२,४७६.७८ | |
| ०.०० | शाखा समायोजन सि.डी.एस./ | -२०,११,३१७.७१ | |
| | नफा | | |
| २,००,३७,२३०.११ | चालू वर्षाचा नफा | | २,२४,२६,०७२.६८ |
| ९८,७७,४७२.०० | संभाव्य तोटयाचे | | २५,११,११४.०० |
| ४,५२२,५०.०० | बँक गॅरंटी | | १,३८,६५०.०० |
| -४२८४७४.०० | फ्लोटींग अकाउंट | | ३,२६,२७१.०० |
| | ए.बी.बी. | ६,५१,०७३.०० | |
| | आर.टी.जी.एस. /एन.ई.एफ.टी./ आऊटवर्ड | -४,२८,३७४.०६ | |

| मागील वर्षाचे आकडेवारी दि. ३१.०३.२०१७ | जिंदगी | रक्कम रुपये ३१.०३.२०१८ | रक्कम ३१.०३.२०१८ |
|---|---|---|---|
| २१,२२,७८,११६.०० | क) नॉन एसएलआरप्रमाणे गुंतवणूक | २२,०५,५९,१२४.०० | |
| | इतर बँकेत | | |
| ३,८०,००,०००.०० | बँक ऑफ बडोदा | २,३०,००,०००.०० | |
| ५४,६७,१२६.०० | पंजाब नॅशनल बँक, अमरावती | ०.०० | |
| १८०,००,०००.०० | सेन्ट्रल बँक, अमरावती | २,२०,००,०००.०० | |
| ०.०० | सिटीयुनियन बँक | | |
| ०.०० | आय.सी.आय.प्रुडेन्शियल म्युचअल फंड | ४,००,००,०००.०० | |
| ०.०० | एस.बी.आय. म्युचअल फंड | ५,५०,००,०००.०० | |
| | ठेवी | | |
| ३,५२,००,०००.०० | आयडीबीआय बँक नागपूर | ३,५२,००,०००.०० | |
| ०.०० | कॉसमॉस बँक, अमरावती | | |
| २५,००,०००.०० | सारस्वत को-ऑप बँक | २९,६६,७२३.०० | |
| ६,३१,७०,०००.०० | बँक ऑफ महाराष्ट्र | ४,३३,८१,६६१.०० | |
| | इतर सहकारी संस्था भाग गुंतवणूक | | |
| १,०००.०० | अमरावती जि. म.स. बँक | १,०००.०० | |
| १०,०००.०० | महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, मुंबई | १०,०००.०० | |
| ५,२५,०८,०००.०० | इतर आर्थिक संस्थामध्ये गुंतवणूक | ५,२५,०८,०००.०० | |
| १५,०६,०००.०० | मुक्ती टॅक्स फ्री बॉंड | १५,०६,०००.०० | |
| १०,०२,०००.०० | नाबार्ड बॉंड | १०,०२,०००.०० | |
| १,००,००,०००.०० | एलआयसी हाऊसिंग | १,००,००,०००.०० | |
| ४,००,००,०००.०० | पी.एन.बी.हाऊसिंग | ४,००,००,०००.०० | |
| | सभासदांस कर्जे व अग्रिम | | |
| ४८,११,००,२५५.६१ | अ) अल्प मुदती कर्जे | ५४,८२,००,४५४.८५ | १२७,९७,६७,११६.७७ |
| २७,४१,३७७.०० | एन.एस.सी. /के.वि.पी. कर्ज | ४४,०७,८४४.०० | |
| ८,०७,५२,८०९.०० | ओव्हरड्राफ्ट लोन | ७,१०,३६,२७२.०० | |
| ३,०६,८६,९३१.०० | मुदती ठेवीवरील कर्ज | ३,२७,६०,८७४.०० | |
| २,६६,२३,११९.०४ | मुदती ठेवीवरील अधिविकर्ष | २,३२,३०,५२६.७३ | |
| | इतर कर्जे | | |
| ६,४८,६४,११७.०० | सुवर्ण तारण कर्ज | ७,५०,५२,६६६.०० | |
| ३०,१०,१८६.०० | कृषी कर्ज | २१,००,४५१.०० | |
| २७,८६,८७,८०१.८७ | कॅश क्रेडीट (सुरक्षित) | ३२,०४,१०,७५७.३८ | |
| २७,२३,८४३.०० | कर्मचारी अग्रिम | ३१,४०,२६६.०० | |
| १६,७१,९६,४७०.७४ | ब) मध्यम मुदती कर्जे | १४,९२,३४,३१६.१८ | |
| ३,११,५२,८२७.०० | वैयक्तिक कर्जे (सुरक्षित) | २,६८,५०,४८५.०० | |
| ५,८०,१३२.०० | शेअर हाऊस सिक्युअर्ड | ४,४२,७०३.०० | |
| ३,६१,५१,०३६.०० | वैयक्तिक कर्जे (विना) | ३,८२,९३,६१७.०० | |
| ४,५६,१४,७६१.०४ | वाहन कर्ज | ३,८६,५४,३३०.१८ | |
| ४,४८,९२,८९४.०० | एमएसएमई (मॅन्युफॅक्चर) | ३,३४,०५,३६४.०० | |
| ०.०० | नैसर्गिक व्यवसाय | ११,०८,३६७.०० | |
| २३,६४,८०,०५४.२४ | क) दिर्घ मुदती कर्जे | ५८,२२,४२,६८१.०४ | |
| १७,७४,३१,६६३.०० | एमएसएमई (सेवा) | २८,९२,१८,४११.५० | |
| १०,३४,८५,७८६.०० | गृह कर्ज | १०,६०,१८,१२०.०० | |